# शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ बी.ए.एम.एस.

# प्रवेशा संदर्भात विद्यार्थी व पालक यांना

# महत्वाची सूचना

- प्रथम वर्ष **B.A.M.S.** ची प्रवेश प्रक्रिया हि प्रवेश नियामक प्राधिकरण ( **ARA**) व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (**CET CELL**) मुंबई यांच्या नियम व अटी यांच्या अधीन राहुन दिलेल्या वेळेत पार पडेल.
- ज्या विद्यार्थ्यांचे शासनाकडून महाविद्यालयाच्या निवड यादीमध्ये नाव निश्चित झाले आहे त्या प्रवेशासाठी विद्यार्थी स्वत: उपस्थित असणे बंधनकारक आहे.
- विद्यार्थ्यांजवळ **NEET UG - 2024** माहिती पुस्तकेमध्ये नमुद केलेली तसेच शासन नियमानुसार लागणारी सर्व मूळ प्रमाणपत्रे जमा करणे बंधनकारक आहे. मुळ प्रमाणपत्रां संदर्भात महाविद्यालयाने जी **List of Documents 2024** दिली आहे त्याप्रमाणे मूळ प्रमाणपत्रे व त्याच्या स्वसांक्षाकित प्रती जोडाव्यात व **Scan Document Pendrive** मधून जमा करावे.
- आरक्षणानुसार जर प्रवेश मिळाला असेल तर मूळ प्रमाणपत्रामध्ये आवश्यक असणारे आरक्षण विषयी लागणारे मुळ प्रमाणपत्र विहित नमुन्यामध्ये जमा करणे बंधनकारक आहे. उदा. **Caste Certificate, Caste Validity, Non-Creamy layer**, **EWS** प्रमाणपत्र, **Hilly Area** प्रमाणपत्र, **Muslim Minority** प्रमाणपत्र, **Defence** प्रमाणपत्र.
- विद्यार्थ्यांच्या मूळ प्रमाणपत्रांमध्ये जर नावाच्या **Spelling** मध्ये बदल असेल तर त्याबाबतचे **Affidavit** प्रवेश घेतेवेळी सादर करावे लागेल.
- सर्व मुळ प्रमाणपत्रांचे **500 Kb** च्या आत **Scan Document Pendrive** मधून जमा करणे बंधनकारक आहे.
- आपला प्रवेश निश्चित करत असताना महाविद्यालयामध्ये जमा करावयाची मुळ कागदपत्रे हि विहित नमुन्यातचं असावीत. उदा. **Medical Fitness Certificate** हे **NEET UG - 2024** माहिती पुस्तकेमधील **Annexure- H** मध्ये संबधित डॉक्टर यांच्या **Letter Head** वर असावे.

- जर विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये आपला प्रवेश निश्चित करायचा असेल तर **Status Retention Form** भरावा लागेल व पुढील फेरीसाठी जायचे असेल तर **Status Retention Form** भरून देवू नये.
- जर विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये आपला प्रवेश निश्चित करायचा असेल तर **Status Retention Form** भरावा व अशा विद्यार्थ्यांनी मुळ प्रमाणत्रासह तीन प्रती स्वसांक्षाकित **( Self Attested )** जमा कराव्यात. तसेच ज्यांना पुढील फेरीसाठी पात्र व्हायचे आहे त्यांनी मुळ प्रमाणपत्रांसह दोन प्रती स्वसांक्षाकित **( Self Attested )** जमा कराव्यात.
- प्रवेशासाठी आवश्यक असणारे शुल्क हे शुल्क नियामक प्राधिकरण , मुंबई यांनी निश्चित केलेले आहे तरी प्रवेशावेळी शासनाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांनी संबधित फी चा महाविद्यालयाच्या नावाचा डिमांड ड्राफट **( D.D.)** जमा करणे बंधनकारक आहे. फक्त शनिवार व रविवार तसेच शासकिय सुट्टीच्या दिवशी आपण प्रवेश निश्चित करत असाल तर संबधित रकमेचा चेक स्विकारला जाईल परंतु सुट्टीच्या दुसऱ्या दिवशी सदर रकमेचा डिमांड ड्राफट **( D.D.)** जमा करावा लागेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.
- जे विद्यार्थी आपल्या आरक्षणानुसार भरावयाच्या शैक्षणिक शुल्कामध्ये सवलत घेवू इच्छितात म्हणजे शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत अशा विद्यार्थ्यांनी प्रवेशावेळी पुढीलप्रमाणे मूळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे अन्यथा महाविद्यालयाच्या संपुर्ण रकमेचा डि. डि. सादर करावा.
- शिष्यवृत्तीसाठी आवश्यक कागदपत्रे — मूळ उत्पन्नाचा दाखला, ओरिजनल रेशन कार्ड. तसेच जर आपल्या पालकास तीन **(3)** अपत्ये **( Boys)** असतील तर असे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र होणार नाहीत त्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी संपूर्ण रकमेच्या फी चा डि. डि. सादर करावा लागेल.
- शिष्यवृत्तीसाठी तसेच प्रवेशासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रामध्ये कोणत्याही प्रकारे तडजोड केली जाणार नाही व याबाबत कोणतीही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही व याबाबत कोणीही महाविद्यालयीन प्रशासनाशी व प्रवेशासंदर्भातील समितीशी विनाकारण वाद घालू नयेत.

Hon. Shri. Annasaheb Dange Ayurved Medical College & PGRC, Ashta.
MD / MS
Tal.Walwa,
Dist.Sangli.
416 301

# B.A.M.S. ADMISSION PROCESS 2024-2025

ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या राउंडमधून प्रवेश मिळाला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाकडून हार्दिक हार्दिक अभिनंदन !

- शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ या वर्षाची **B.A.M.S.** ची प्रवेश प्रक्रिया हि प्रवेश नियामक प्राधिकरण मुंबई, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष मुंबई व शुल्क नियामक प्राधिकरण मुंबई यांच्या नियमांच्या अधिन राहून होईल.
- प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांची **NEET UG- 2024 Information Brochure** मध्ये नमूद केले प्रमाणे सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. ( सोबत आवश्यक कागदपत्रांची यादी जोडली आहे त्या क्रमाने कागदपत्रे जोडावीत. )
- जी मुळ प्रमाणपत्रे आपण सादर करणार आहात त्यांची **SCAN COPY ( pdf 500 kb Each Document ) Pendrive** मधून सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक **SCAN Documents** यांना संबधित प्रमाणपत्राचे नाव देणे आवश्यक आहे.

Shri Annasaheb Dange Ayurved Medical College & PGRC, Ashta
MD / MS
Tal.Walwa, Dist.Sangli. 416 301

(02)

- **NEET Score Card- 2024** हे **Re-Revised** सादर करावे.
- तसेच जी मुळ प्रमाणपत्रे आपण सादर करणार आहात त्यांच्या **Zerox Copies** ज्या क्रमाने मुळ प्रमाणपत्रे सादर करणार आहात त्याच क्रमाने व व्यवस्थित असाव्यात. मोबाईलवर कागदपत्राचे काढलेले फोटो यांची **Zerox** प्रत चालणार नाही याची नोंद घ्यावी. **Zerox Copies** या व्यवस्थित दिसणाऱ्या व **Self Attested** असाव्यात..
- विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांमध्ये काही **Spelling Mistake** असेल तर त्याबाबतचे **Affidavit** (प्रतिज्ञापत्र) सादर करणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यांनी सोबत जोडलेल्या **Fee Structure** प्रमाणे संबधित फि चा डि. डि. ( **Demand Draft** ) प्रवेशावेळी जमा करणे बंधनकारक आहे. जर आपण शासकीय सुट्टीच्या दिवशी आपला प्रवेश निश्चित करत असाल तर संबधित फि चा धनाकर्ष ( **Cheque**) स्विकारला जाईल परंतु लगेच दुसऱ्या दिवशी आपणास सदर रकमेचा डि. डि. ( **Demand Draft** ) सादर करावा लागेल याची नोंद घ्यावी. याबाबत कोणीही महाविद्यालयीन प्रशासनाशी वाद विवाद करू नयेत.

Parag 13/9/24
PRINCIPAL
Shri Annasaheb Dange Ayurved Medical